# पोलीस अधीक्षक कार्यालय,अहमदनगर
## (आस्थापना शाखा)

दुरध्वनी क्र.०२४१ २४१६११३
वेबसाईट-www.ahmednagarpolice.org Email: sp.ahmednagar@mahapolice.gov.in
फॅक्स क्र. ०२४१-२४१६१३३

क्रमांक :-आशा/१०७/४.१/से.आ.प्र.यो/लाभ/ 2938 /२०२२, अहमदनगर, दिनांक : -8 /०३/२०२२

**संदर्भ:-** १)म.शा.सा.प्र.विभाग नि.क्र.एसआव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८ जुन १९९५
२)म.शा.सा.प्र.विभाग नि.क्र.वेतन १९९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
३)म.शा.सा.प्र.विभाग नि.क्र.वेतन २००२/प्र.क्र.१/९५/सेवा-३,दि.११.०१.२००२
४)म.शा.सा.प्र.विभाग नि.क्र.-११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
५)म.शा.वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२ मार्च २०१९
६)म.शा.सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२/२०१९,दिनांक.०१ ऑगस्ट २०१९
७)दिनांक.२८/०२/२०२२ रोजी सेवातंर्गत आश्वासीत प्रगती योजनेची बैठक.

**विषय :-**सातव्या वेतन आयोजागमध्ये, तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या अनुज्ञेयते बाबत.

----००o----

**आदेश:-**

सातव्या केंद्रीय वेतन आयोगाचा शिफारस अहवाल विचारातू घेवून, केंद्र शासनाने सुधारीत वेतनश्रेणी, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना तसचे अन्य सेवाविषयक लाभ केंद्र शासकीय कर्मचा-यांना यापुर्वीच लागु केलेले आहेत. केंद्र शासकीय कर्मचा-यांना, केंद्र शासनाने लागू केलेल्या सुधारीत सेवातंर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या स्वरुपामध्ये उचित फेरफार करुन राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद शिक्षकेतर कर्मचारी व अन्य शिक्षकेतर कर्मचारी यांना १०,२० व ३० वर्षाच्या सेवेनंतर तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागु करण्याची शिफारस व अनुषंगिक शिफारसी श्री.के.पी. बक्षी, अध्यक्ष, राज्य वेतन सुधारण समिती, २०१७ यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने,राज्य शासनास केल्या होत्या.

महाराष्ट्र शासन,शासन अधिसुचना,वित्त विभाग क्रमांक.वेपूर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक. ३० जानेवारी २०१९ अन्वये सेवेत असताना दिनांक ०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मंजूर करण्यांत आले आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दिनांक २ मार्च २०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये, तिस-या लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा अनुज्ञेयबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे.

परि.क्र.२ मध्ये नमूद शासन निर्णयामध्ये सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १०,२०, व ३० वर्षांच्या नियमीत सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही दिनांक ०१/०१/२०१६ पासून पुढील प्रमाणे अंमलात येईल.

योजनेचा तपशिल १) सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रुपये-१५६००-३९१०० व ग्रेड पे ५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/अधिकारी यांना लागू राहील. संबंधीत कर्मचारी /अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करण्यास सुरुवात करतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

२)या योजनेखाली पात्र कर्मचारी/अधिकारी यांना संपुर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजूर करण्यांत येईल. मात्र ज्या कर्मचारी/अधिकारी यांना दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत. त्यांना या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा ३० वर्ष असल्यास, या ३० वर्षांच्या कालावधीत झालेल्या कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या, किमान तीन असावी. त्याशिवाय ज्या कर्मचारी/अधिकारी यांना तीन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेअंतर्गत एकही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

३) या योजने अंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून झालेल्या संपुर्ण सेवा कालावधीत, संबंधीतास सुरुवातीस लाभ मंजूर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्यांची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना एकूण तीन कार्यात्मक पदोन्नतीच्या संख्येमध्ये करण्यात येणार नाही.

४) या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थींस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा उत्तीर्ण असणे, गोपनिय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबीत नसले(शा.निर्णय सा.प्र.वि.दि.१५.१२.२०१७ नुसार), यथास्थिती जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पुर्तता करणे आवश्यक आहे.

अहमदनगर जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवरील **सोबत जोडलेल्या पोलीस हवालदार व सहाय्यक फौजदार यांची पदोन्नतीसाठी** पात्र/अपात्र आवश्यक असलेली अर्हता पुर्ण केल्याने त्यांनी सलग १० वर्षे पोलीस हवालदार, सहाय्यक फौजदार या पदावर सेवा पुर्ण् केल्यामुळे उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियमित १० वर्षाचे सेवेनंतर वरच्या पदाचा पदोन्नतीच्या साखळीतील वेतनश्रेणी देय असल्याने त्यांना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्या दिनांकापासून **सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत** प्रचलित शासननिर्णय व खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यांत येत आहे.

अटी व शती:-

(A) उक्त नमूद पोलीस हवालदार,सहाय्यक फौजदार यांना स्तंभ क्र.०५ मध्ये दिलेल्या दिनांकापासून महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम १९८१ मधील नियम ११(१)प्रमाणे वेतन निश्चित करण्यांत येईल. महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र.पीएवाय १०८२ सीआर ११००(ए) एसईआर-३,दि.०६.११.१९८४ तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि.३१.०८.२००९ मधील तरतुदीनुसार त्यांना सदर वेतननिश्चीतीसाठी विकल्प देय/ अनज्ञेय राहील, तथापि नमूद पोलीस हवालदार, सहाय्यक फौजदार यांनी सदर वेतननिश्चितीचा विकल्प सदर आदेश निर्गमित केल्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आंत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तशा आशयाचे बंधपत्र मुदतीत देणे आवश्यक राहील तसेच प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

(B) सामान्य प्रशासन विभाग दि.२८ मे २०१८ चे अधिसुचनेनुसार संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच आश्वासीत प्रगती योजनेचा प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय राहील.

(C) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतंर्गत सदर लाभ हा दि.०२.०३.२०१९ व वित्त विभाग यांचेकडील पत्र दि.१०.१२.२०१९ नुसार संबंधीतांना सदर योजनेच्या लाभाची रक्कम रोखीने देय राहील.

(D) सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेतंर्गत जबाबदारी आणि कर्तव्यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चितीचा लाभ देण्यात येईल. मात्र वेतन निश्चितीमुळे मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. कार्यात्मक पदोन्नती मिळेपर्यत सध्याच्या पदावरील वेतनासमवेत देण्यात आलेले अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील.

(E) या योजनेतंर्गत पदोन्नती मिळाली तरी नमूद पोलीस हवालदार, सहाय्यक फौजदार यांचे नांव मुळ संवर्गाच्या सेवा जेष्ठता सुचित राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळी नियमित पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यांत येईल. नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्यास किंवा नियमित पदोन्नती नाकारल्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

(F) या योजनेखाली देण्यात आलेला लाभ काढून घेतल्यानंतर वेतननिश्चिती जणुकाही या योजनेचा लाभ दिले नव्हते असे समजून महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यांत येईल.

(G) सदर योजनेचा लाभ हा वेतन पडताळणी पथकाचे वेतन पडताळणीचे अधीन राहून मंजूर करण्यांत येत आहे. वेतन पडताळणी पथकाचे पडताळणी मध्ये प्रस्तृत योजनेचा लाभ कर्मचारी / अधिकारी यांना देय नसल्याचे आढळून आल्यास किंवा सदर योजना लागू केल्यामुळे अतिप्रदान झाल्याचे आढळून असल्यास त्याची एक रक्कमी वसूली संबंधीताकडून करण्यांत येईल या अटीच्या अधीन राहून सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यांत येत आहे.

(मनोज पाटील)
पोलीस अधीक्षक,अहमदनगर

प्रति,

सर्व पोलीस स्टेशन/शाखा/कार्यालय अहमदनगर जिल्हा
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदनगर जिल्हा
सर्व अपर पोलीस अधीक्षक,अहमदनगर/श्रीरामपूर
रापोनि.पोलीस मुख्यालय अहमदनगर/प्रभारी अधिकारी नियंत्रण कक्ष,अहमदनगर

प्रत:- प्रमुख लिपीक लेखाशाखा/वेतन लिपीक/पेन्शन लिपीक/जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक
प्रत सस्नेह:- कोषागार अधिकारी,अहमदनगर